# भारतीय इतिहासातील सरोजिनी नायडू यांच्या कार्याचा आढावा ...

कु. ऐश्वर्या यशवंत पाटील
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त).
paishwarya671@gmail.com

**घोषवारा :-**

१८५७ ते १९४७ या कालावधीमध्ये घडलेल्या भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात आपल्याला असंख्य चढउतार आढळतात. त्यानंतर १९२० मध्ये जेव्हा गांधीजींच्या नेतृत्वाखाली लढा सुरू झाला, तेव्हा हा कालखंड अनन्यसाधारण होता. १९२० - १९४७ हा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे गांधीजी हे प्रयोगशील नेते आणि विकसनशील दृष्टीकोन बाळगणारे विचारवंत होते. दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावरुन परतल्यानंतर जुलमी ब्रिटिश राज्यकर्ते भारतीयांविरूद्ध करत असलेले रानटी कृत्य व त्यांची जुलुमगिरी पाहून गांधीजींनी भारताला ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा निर्णय घेतला व त्यादृष्टीने प्रयत्न करण्यास सुरूवात केली. सत्य आणि अहिंसा ही त्यांची शक्तीशाली शस्त्रे होती. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक संघर्ष आणि लढाया केल्या. या संघर्ष आणि लढ्यामध्ये पुरुषांबरोबरच स्त्रियांचाही सहभाग होता. अश्याच एका क्रांतिकारी स्त्रीचा महत्त्वपूर्ण वाटा या चळवळींमध्ये होता आणि त्या म्हणजे सरोजिनी नायडू. सरोजिनी नायडू यांचे गांधी चळवळीत महत्त्वाचे योगदान आहे. सरोजिनी नायडू या भारताच्या क्रांतिकारी महिला होत्या. भारताच्या स्वातंत्र्याकरीता भारतीयांवर केल्या जाणाऱ्या अहिंसात्मक संघर्षाचे बारकावे सादर करण्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. एवढेच नव्हे तर त्यांनी गांधीवाद सिद्धांताचा प्रसार करण्याकरिता केवळ युरोपमध्येच नव्हे तर संयुक्त राष्ट्र संघ व अमेरीकेपर्यंतची यात्रा केली व भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरोजिनी नायडू या उत्तरप्रदेशच्या पहिल्या महिला गव्हर्नर (राज्यपाल) बनल्या. प्रस्तुत शोध निबंधातून गांधीयुगातील स्वातंत्र्य लढ्यात सरोजिनी नायडू यांच्या कार्याची व योगदानाची चर्चा केली जाणार आहे.

**कळीचे शब्द:** विकसनशील, राज्यकर्ते, अहिंसात्मक, संयुक्त राष्ट्र संघ, गव्हर्नर..

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांची स्थिती फार मागासलेली होती. अश्या काळात स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेणे तर दूर स्त्रियांना घराबाहेर पाऊल ठेवण्याची देखील परवानगी नव्हती. स्त्रियांची अशी परिस्थिती असतानादेखील त्याकाळी एक स्वातंत्र्यसेनानी स्त्री मोठ्या निर्धाराने या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाली होती, आणि त्या म्हणजे भारताची कोकीळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरोजिनी नायडू. ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्य स्मरणात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. सरोजिनी नायडू त्या क्रांतिकारी महिलांपैकी एक आहेत, ज्यांनी गुलामगिरीत अडकलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरीता प्रचंड संघर्ष केला.

सरोजिनी नायडू यांना सतत काहीतरी करण्याची ऊर्जा आणि उमेद होती. त्यांनी साहित्याची प्रचंड आवड होती. विवाहानंतरही त्यांनी आपले लिखाण सुरू ठेवले होते. गांधीजींच्या प्रत्येक चळवळीत सरोजिनी नायडू यांचा सक्रिय सहभाग होता. आणि फक्त त्याच नव्हे तर त्यांनी आपल्यासोबत अनेक स्त्रियांना स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले. त्याकाळी स्त्रियांचे कार्य फक्त चूल आणि मूल इतकेच मर्यादित होते. यामुळेच स्त्रियांनाही चार भिंतीतच आपले जग आहे असे वाटत असावे. ज्या स्त्रियांनी स्वतःला चार भिंतींच्या आत ठेवले होते त्यांना सरोजिनी नायडूंनी तिथून बाहेर काढून स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत सहभागी केले. गांधीजींनी सुरू केलेल्या अनेक चळवळींमध्ये सरोजिनी नायडू यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. सरोजिनी नायडूंवर लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांचा व यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव होता.

**जन्म व पूर्वायुष्य :-**

स्वातंत्र्ययोद्ध्या, कवयित्री, उच्चशिक्षित व बहुभाषिक ज्ञान अवगत असलेल्या अशी अष्टपैलू ओळख असलेल्या महान स्वातंत्र्यसेनानी महिला सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव डॉ. ओघरनाथ चट्टोपाध्याय व त्यांच्या आईचे नाव वरदा सुंदरी होते. त्यांचे वडील बंगाली ब्राम्हण होते. ते ब्राम्हण समाजाचे अनुयायी होते. ते रसायनशास्त्रातील तज्ञ होते. त्यांनासुद्धा अनेक भाषांचे ज्ञान अवगत होते. सरोजिनींना त्यांच्या आई - वडीलांनी उच्च

दर्जाचे शिक्षण दिले. त्या मद्रास प्रांतातून सर्वाधिक गुणाने मॅट्रिक परिक्षा पास झाल्या. वयाच्या ११ व्या वर्षापासून त्यांनी इंग्रजी पद्यरचना करण्यास सुरूवात केली होती. सरोजिनींना हैदराबादमध्ये निजामद्वारा शिष्यवृत्ती प्राप्त झाली होती. त्याच शिष्यवृत्तीच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेण्यासाठी त्या तीन वर्षांसाठी इंग्लंडला गेल्या. लंडनच्या प्रवासादरम्यान त्यांची ओळख एडमंड गोसे आणि आर्थर साइमंस यांच्याशी झाली, जे उत्तम कवी व लेखक होते. सरोजिनी नायडू लंडनमध्ये एका महिलेच्या घरी स्थित होत्या. त्या महिलेलाही साहित्याची प्रचंड आवड होती. त्यामुळे तिच्या घरी सतत काव्यरचनेच्या गोष्टी होत असत. त्यामुळे त्या महिलेच्या घरी अनेक कवी, लेखक येत असत.

इंग्लंड प्रवासादरम्यान त्यांचे दक्षिण भारतीय डॉक्टर गोविंद राजुलु नायडू यांच्याशी प्रेमसंबंध जुळले. १८९८ मध्ये जेव्हा त्या भारतात परतल्या तेव्हा त्यांचे वय १९ वर्ष होते. भारतात परतताच त्यांनी २ सप्टेंबर १८९८ मध्ये डॉक्टर गोविंद राजुलु नायडू यांच्याबरोबर विविह केला. विवाहानंतर त्या सरोजिनी चट्टोपाध्याय वरून सरोजिनी गोविंद नायडू झाल्या व जगभर याच नावाने प्रसिद्ध झाल्या.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान :-**

**१. सरोजिनी नायडूंचे राजनैतिक जीवन आणि स्वातंत्र्य संग्रामातील भुमिका :**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्या एक निष्ठावान देशभक्ताप्रमाने सतत प्रयत्न करत होत्या. त्या सतत लोकांच्या मनामध्ये स्वातंत्र्याविषयी नवी उमेद व देशाविषयी प्रेम निर्माण करण्याचे काम करत असत. त्यामुळे लोकांमध्ये देशप्रेमाची भावना वाढीस लावण्यात सरोजिनी नायडू यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. सरोजिनी नायडूंनी मुख्यतः स्त्रियांमध्ये क्रांतिकारी विचार प्रगट करण्यास सुरुवात केली. ज्यावेळी सरोजिनी नायडू महिलांच्या मनामध्ये क्रांतिकारी विचार
पेरत होत्या त्यावेळी महिलांना फारसे स्वातंत्र्य नव्हते. त्यावेळी महिलांचे कार्य चूल आणि मूल एवढेच आहे असा समाजाचा समज होता. असे असतानाही सरोजिनींनी हे कार्य हाती घेतले होते.

समाजात स्त्रियांची अशी परीस्थिती असल्यामुळे त्यांची मानसिकताही तशीच बनली होती. त्यांनीही आपले कार्य चूल आणि मूल एवढेच आहे असेच गृहित धरले होते. स्त्रियांची ही मानसिकता बदलणे हे कार्य अजिबात सोपे नव्हते. परंतु हे काम सरोजिनी नायडू अत्यंत निष्ठेने करत होत्या. त्या गावागावात जाऊन स्त्रियांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देत असत. त्या आपल्या विचारांनी त्यांना प्रोत्साहित करत. त्यांनी महिला सशक्तीकरण व त्यांच्या अधिकाराकरीता आपला आवाज बुलंद केला होता. १९१६ ला सरोजिनी नायडूंची भेट महात्मा गांधीजींशी झाली. गांधीजींना भेटल्यानंतर त्यांची विचारसरणी आणखी प्रभावित झाली. त्यांनी आपली पूर्ण शक्ती देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लावली.

**२. सरोजिनी नायडू यांचे महीलांविषयीचे कार्य :**

१९१७ साली सरोजिनी नायडूनी दोन महत्त्वपूर्ण कार्य केले. एक म्हणजे त्या क्रांतिकारी विचार प्रगट करण्यासाठी त्या संपूर्ण भारत फिरल्या. आणि दुसरे कार्य म्हणजे त्यांनी महिला मताधिकार आंदोलनाचे नेतृत्व केले. १८ डिसेंबर १९१७ मध्ये श्रीमती मारग्रेट कजिंस यांची प्रेरणा घेऊन महिला मताधिकाराच्या मागणीसाठी गव्हर्नर जनरल चेम्सफोर्ड आणि भारत सचिव मांटेग्यु यांच्याकडून १८ महिलांचे एक शिष्टमंडळ देण्यात आले होते. ज्याचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले होते. या शिष्टमंडळाची मागणी अशी होती की महिला व पुरुष यांना समान अधिकार मिळावेत. त्यांची ही मागणी ५ वर्षांनंतर स्विकारली गेली. १९१७ - १९४७ या कालावधीमध्ये जितक्या महत्त्वपूर्ण घटना घडल्या त्यामध्ये सरोजिनी नायडू यांचा सक्रिय सहभाग होता.

**३. असहकार चळवळ :**

१९१९ मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या असहकार आंदोलनामध्ये सरोजिनी नायडू यांनी मोठ्या तत्परतेने भाग घेतला होता. गांधीजींच्या साबरमतीच्या आश्रमात सत्याग्रहाच्या प्रतिज्ञेचे प्रारूप तयार करण्यात आले होते. सरोजिनी फक्त प्रारूप तयार करण्यातच नाही तर त्या प्रतिज्ञा घेण्यातही अग्रेसर होत्या. यानंतर त्यांनी मुंबई, मद्रास, अहमदाबाद असा दौरा केला. तसेच त्यांनी स्त्रियांनाही या सत्याग्रहात सहभागी होण्याची मागणी केली.

**४. दांडी यात्रा :**

दांडी यात्रा म्हणजे भारतातील तत्कालीन ब्रिटिश शासनाने मिठासारख्या जीवनावश्यक गोष्टीवर लावलेल्या कराच्या विरोधात इ.स. १९३० साली घडलेला सत्याग्रह होता. यालाच मिठाचा सत्याग्रह म्हणतात. या दांडी यात्रेची सुरुवात १२ मार्च १९३० रोजी साबरमती आश्रमापासून सुरू झाली. या यात्रेत गांधीजींच्या बरोबर ७८ निवडक अनुयायी होते. यात सरोजिनी नायडू व इला भट यांचाही समावेश होता. यात्रा पुढे निघाली तशी लोकांची गर्दी वाढतच गेली. गांधीजींना सुरूवातीला महिलांना या यात्रेत सहभागी होण्याची परवानगी द्यायची नव्हती, कारण अटकेच्या उच्च जोखमीसह ही यात्रा शारीरिकदृष्ट्या कष्टाचीही होती. पण सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय आणि खुर्शेद नौरोजी यांनी गांधीजींचे मन वळवले. नुसते मनच वळवले नाही तर ते या यात्रेत सामीलही झाले. ही यात्रा २४ दिवस चालली आणि या यात्रेत सहभागी झालेले लोक तब्बल ३८५ कि.मी. पर्यंत पायी चालले. यात्रा दांडी येथे समुद्रकिनारी ६ एप्रिल १९३० ला पोहोचली. त्यादिवशी सकाळी साडे सहा वाजता गांधीजींनी चिमूटभर मीठ उचलून कायदेभंग केला, तेव्हा कायदेभंगाच्या मोठ्या प्रमाणावरील चळवळीची ती सुरूवातच ठरली. ६ एप्रिल १९३० रोजी गांधींना अटक करण्यात आली. तेव्हा त्यांनी सरोजिनी नायडूंची मोहिमेच्या नवर्या नेत्या म्हणून नियुक्ती केली.

**सरोजिनी नायडू यांचे साहित्यातील योगदान :**

एका कवीने त्याच्या काव्यरचनेत सरोजिनी नायडू यांचे सुंदर वर्णन केले आहे. त्या ओळी पुढीलप्रमाणे आहेत :

भारत के उपवन कानन की, कांत कोकीला कहलाती थीं,
देश प्रेम की सुधावृष्टी कर, मन को, जन को, नहलाती थी |

यावरून आपल्याला कळते की, सरोजिनी नायडूंनी केवळ एक महान क्रांतिकारी आणि राजनितीतज्ञ म्हणूनच ख्याती प्राप्त केली नाही तर त्या एक चांगल्या कवयित्री म्हणून देखील प्रसिद्ध झाल्या. त्यांनी आपल्या कवितांमधून लोकांमध्ये क्रांतिकारी बीज पेरलेच शिवाय भारतीय संस्कृतीचीदेखील अद्भुत अशी व्याख्या केली. बालकांच्या साहित्याचे त्यांनी विपुल लेखन केले, आणि त्याकरिता देखील त्या प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या याच सुरेख कविता आणि गितांमुळेच त्यांना भारताची कोकीळा म्हणजेच भारताच्या नाइटिंगल म्हणून सन्मानित करण्यात आले.

१९०५ ला त्यांच्या कवितांचा संग्रह "गोल्डन थ्रेसहोल्ड" या नावाने प्रकाशित झाला. त्यानंतर त्यांचे आणखी दोन संग्रह प्रकाशित झाले ते म्हणजे "दी बर्ड ऑफ टाईम" आणि "दी ब्रोकन विंग्ज". या कवितांना केवळ भारतातच नाही तर इंग्लंडमध्येही लोकांनी फार पसंती दिली. आणि यामुळेच त्यांना एक शक्तिशाली लेखिका म्हणून ओळख मिळाली. सरोजिनी नायडू यांनी कवितांबरोबरच काही निबंध व आर्टिकल यांचे देखील लिखाण त्यांनी केले होते.
उदा., " वर्ड्स ऑफ फ्रीडम" हे त्यांच्या राजनितिक विचारांवर आधारीत होते.

**सरोजिनी नायडू यांचे इतर साहित्य :**

- " दी बर्ड ऑफ टाईम : सॉंग ऑफ लाईफ.
- डेथ अँड दी स्प्रिंग.
- दी ब्रोकन विंग : सॉंग ऑफ लव्ह.
- मुहम्मद जिन्ना : अन एम्बेसिडर ऑफ युनिटी.
- दी सेप्ट्रेड फ्लूट : सॉंग्ज ऑफ इंडिया.
- अलाहाबाद : किताबीस्तान.
- दी इंडियन विवर्स.
- फीस्ट ऑफ यूथ.
- दी मॅजिक ट्री एंड दी विजार्ड मास्क.

**निष्कर्ष :**

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संघर्ष करणाऱ्या महान स्वातंत्र्यसेनानी व क्रांतिकारी महिला असणाऱ्या सरोजिनी नायडू यांचे निधन २ मार्च १९४९ ला हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने झाले. सरोजिनी नायडूंनी आपले संपूर्ण आयुष्य देशाला समर्पित केले. आपल्या जीवनात त्यांनी भरपूर ख्याती आणि सन्मान प्राप्त केला होता, शिवाय त्या लोकांसाठी प्रेरणास्रोत देखील ठरल्या.

सरोजिनी नायडू यांनी महीलांसाठी वेगवेगळ्या सुधारणा केल्या. त्यांचा आंतरजातीय विवाह हे सुद्धा एक क्रांतिकारी पाऊल होते. तसेच त्या गांधीजींच्या शिष्या होत्या, व त्यांच्यावर गांधीजींचा व लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रभाव होता. इतिहासकारांच्या मते, ज्या स्त्रिया अनेक अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवू शकतात तर त्या अनेक मोठी मोठी कार्य सहज पार पाडू शकतात. महात्मा फुले असे म्हणतात की, " सर्व सामाजिक चळवळींचे नेतृत्व स्त्रियांकडेच असायला हवे".

या शोधनिबंधातून असे दिसून येते की, स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचे खूप मोठे योगदान होते. सरोजिनी नायडू यांसारख्या थोर क्रांतिकारक महीलेने स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन देशासाठी अनेक सुधारणा व कार्ये केली.

**संदर्भ ग्रंथ :**

१. गव्हाणे शुभांगी (२००३), स्त्री परिवर्तनाची आव्हाने, साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद .

२. गांधी नंदिता, शाह नंदिता (१९९४), स्त्री संघर्षाची नवी रूपे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३. खडपेकर विनया (१९९१), स्त्री स्वातंत्र्यवादिनी , विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४. संगवे विलास (1979), *भारतातील सामाजिक समस्या,* पॉप्युलर प्रकाशन,

५. Altekar A.S. (1978), The Position of Women in Hindu Civilization, Motilal Banarasidas, Delhi